आम्हीबी घडलो!

# स्वप्नपूर्तीचे समाधान

**आपल्या देशातील पाच-सहा लाख खेडी योग्य पायाभूत व मूलभूत सेवा-सुविधा नसल्यामुळे विकासात मागे पडत आहेत. तेथील तरुण शिक्षण, नोकरी-व्यवसायानिमित्त शहरांकडे येत आहेत...**

अनिल व्यास



वयाच्या आठव्या वर्षी आईने (श्रीमती इंदिरा व्यास माझी काकू) तेर-ढोकीसारख्या उस्मानाबाद जिल्ह्यातील मागास खेडेगावातून शिक्षणासाठी मला मुंबई महानगरीत आणले. राजा शिवाजी विद्यालयात शिक्षण सुरू झाले. अकरावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करत असतानाच आमच्या घरातील एकूण सांगीतिक वातावरण व बाबांच्या (कै. पं. सी. आर. व्यास) एकूण धावपळीच्या जीवनाचा परिणाम बालमनावर होत गेला व आयुष्यात काही तरी वेगळे काम करावे असे वाटू लागले. काय करावे, कसे करावे हे कळत नव्हते. अबोल स्वभाव, सतत मागे राहण्याची प्रवृत्ती, एकलकोंडा स्वभाव अशा अनेक मानसिक अडचणींमुळे दिशा सापडत नव्हती.

अकरावी उत्तीर्ण झाल्यावर खालसा महाविद्यालयात शास्त्र विभागात पुढील शिक्षण सुरू झाले व नवीन वातावरणात प्रवीण शर्मासारखा एक मित्र मिळाला. परंतु वर्षभरातच तो अमेरिकेत त्याच्या नातेवाइकांकडे शिक्षणासाठी निघून गेला. त्याने नंतर अमेरिकेत येण्याचा बराच आग्रह केला; परंतु किशोरवयात मनात तयार झालेली भावी जीवनाची दिशा काही या प्रस्तावास साथ देत नव्हती. अशाच अवस्थेत पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पदवी परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक आल्याने त्याच महाविद्यालयात अर्धवेळ प्रात्यक्षिक प्रशिक्षक पदावर नोकरी मिळाली. ती करत असतानाच पदव्युत्तर शिक्षणही सुरू झाले. लहान-लहान शिकवण्या मिळू लागल्यामुळे शिक्षणक्षेत्राची आवड निर्माण होऊ लागली. नोकरी कुठे करायची, असा विचार करताना घरच्यांचा आग्रह औद्योगिक जगतात नोकरी शोधावी असाच होता; परंतु आपल्या जीवनात वेगळी वाट चोखाळण्याचा केलेला विचार स्वस्थ बसू देत नव्हता. काहीसे हट्टाने कमी वेळ काम करावे लागणारी शिक्षकी पेशाची नोकरी निवडण्याचा निर्णय घेतला व खालसा महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून नोकरी सुरू झाली.

जीवनात स्थिरस्थावर होणाऱ्या सर्व घटना वेळच्या वेळी होत होत्या; पण मनातील ठरवलेल्या उद्दिष्टाबाबत काही प्रगती

कामात सहभाग घेण्यास सुरवात केली व जसजसे काम करत गेलो तसतसे लक्षात येऊ लागले, की शहरात जशी कामाची गरज आहे त्याहीपेक्षा जास्त गरज खेडेगावात आहे. आपल्या देशातील पाच-सहा लाख खेडी योग्य पायाभूत व मूलभूत सेवा-सुविधा नसल्यामुळे विकासात मागे पडत आहेत. तेथील तरुण शिक्षण, नोकरी-व्यवसायानिमित्त शहरांकडे येत आहेत. (मीपण असाच एक होतो याची जाणीव होतीच). त्यामुळे शहरांपेक्षा खेडेगावात जाऊन काम करावे, असे वाटू लागले.

मुंबईचे आकर्षण माझे वडील व पत्नीलाही नव्हते व मुंबईत राहून खेडेगाव शोधून तेथे काम करणे अशक्यच होते. त्यामुळे स्थिरस्थावर झालेले आपले संसारी व व्यवहारी जीवन बदलून पुण्यात घर करण्याचा निर्णय १९९१ मध्ये घेतला व अमलात आणला. मुंबईतील घर विकून पुण्यात घर घेतले व मुंबई-पुणे प्रवास सुरू झाला. नोकरी मुंबईत व वास्तव्य पुण्यात. १९९४ मध्ये मुळशी तालुक्यातील बाळासाहेब गायकवाड या कार्यकर्त्याची ओळख झाली व पुढील प्रवास सुरू झाला. मुळशी तालुक्यातील खेड्यापाड्यातून ग्रामीण जीवनाचा अभ्यास सुरू झाला. यातूनच स्वयंसेवी संस्था स्थापण्याचा निर्णय घेतला.

व अन्य सार्वजनिक सुट्यांचा उपयोग करून कामाची बांधणी करू लागलो.

ग्रामीण भागात येणाऱ्या अडचणी सोडवणे व स्थानिक पातळीवरच आवश्यक त्या सेवा-सुविधा पुरवणे अशा दिशेने कामाची आखणी करू लागलो. पहिल्या शेतकरी मेळाव्यानिमित्त केलेल्या प्रवासातून दुर्गम असे असदे खोरे हे माध्यमिक शिक्षणापासून वंचित आहे हे लक्षात आले. गावकऱ्यांच्या आग्रहावरून स्वामी विवेकानंद विद्यालय ही माध्यमिक शाळा १९९५ मध्ये सुरू झाली. डोंगरदऱ्यात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १९९६ मध्ये वसतिगृह सुरू झाले. आज एक मुलींचे व दोन

झाले आहे. १२ वर्षे मुंबई-पुणे प्रवास करून एका बाजूस हे काम उभे राहत गेले व नंतर दोन्ही गोष्टी वेळेच्या दृष्टीने करणे अवघड वाटू लागले म्हणून वैयक्तिक आर्थिक परिस्थितीचा अंदाज घेतला. नोकरी न करताही केवळ निवृत्तिवेतनाच्या आधारे भावी जीवन जगता येईल, असा विश्वास वाटू लागला व प्रापंचिक जबाबदाऱ्या पार पडल्याची खात्री पटल्यावर वयाच्या ५१ व्या वर्षी स्वेच्छानिवृत्ती घेतली व सामाजिक कार्यात पूर्णपणे वेळ देऊ लागलो.

आज १२-१३ वर्षांनंतर असे लक्षात येते, की पुण्यातील २५-३० कार्यकर्त्यांचा गट मुळशीत कार्यरत झाला आहेच; पण